सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २९२ | मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ सोने ९९.५०% : ₹ १४१७००
२२ सोने ९१.६०% : ₹ १३०४००
१८ सोने ७५.००% : ₹ १०८०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२६०/-
भाव प्रती १० ग्रॅम

**आजचे अभीष्टचिंतन**




माहीराज सोनवणे
अमळनेर


श्री. आर. जे. पाटील
शिक्षक / पत्रकार


श्री. निरंजन पेंढारे
शिक्षक / पत्रकार


श्री. महावीर सिंघवी
अमळनेर


श्री. अनिल महाजन
अमळनेर


सौ. भारतीआक्का पाटील
अमळनेर


श्री. शिरीष डहाळे सर
अमळनेर



अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिर व डॉ. डिगंबर महाले यांची बदनामी केल्याने अनंत निकमविरुद्ध सोमवार, दि. १३ जुलै रोजी पोलीस व प्रशासनाकडे सामूहिक तक्रार अर्ज देताना सकल हिंदू समाज, हिंदुत्ववादी संघटना, व्हॉईस ऑफ मीडियाच्या अमळनेर शाखेचे पदाधिकारी व सदस्य, धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते.

## श्री मंगळग्रह मंदिर व डॉ. डिगंबर महाले यांची बदनामी केल्याने

# अनंत निकम विरुद्ध पोलीस व प्रशासनाकडे अनेकांनी केल्या सामूहिक तक्रारी

### डॉ. डिगंबर महाले यांनी दिली पोलिसांत फिर्याद

### आज धर्मदाय आयुक्तांकडे करणार तक्रार

### कोर्टाच्या निकालाची सत्य माहिती लपवून धादांत खोटे संदर्भ दिल्याचा आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अनंत रमेश निकम याने सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी त्याच्या व्हॉटस्ॲप, फेसबुक अकाऊंटवर एक व्हिडिओ प्रसिद्ध केला होता. त्यात श्री मंगळग्रह मंदिरावर ताबा मिळविण्याचा बेकायदेशीर कट उधळला! १३ वर्षांनंतर न्यायदेवतेचा ऐतिहासिक निकाल; खोट्या विश्वस्तांचा फेरफार अर्ज सपशेल फेटाळला! मुळासकट उपटून फेकला! असे त्याने त्यात सांगितले. तसेच यासंदर्भात निकम याने अधिक स्पष्टीकरण देताना वस्तुस्थितीदर्शक कोर्टाच्या निकालाची सत्य माहिती न देता खोटी, कपोलकल्पीत माहिती प्रसारीत केली. श्री मंगळग्रह मंदिरासह मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांची बदनामी केली. परिणामी डॉ. महाले यांनी शनिवार, दि. ११ जुलै रोजी अमळनेर पोलिसांत निकमविरुद्ध फिर्याद दाखल केली. तर सोमवार, दि. १३ जुलै रोजी सकल हिंदू समाज तथा विविध हिंदुत्ववादी संघटना, मंगळग्रह सेवा संस्थेचे कर्मचारी व परिसरात व्यवसाय करणारे व्यावसायिक आणि व्हॉईस ऑफ मीडियाच्या अमळनेर शाखेने प्रांताधिकारी, पोलीस उपअधीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्याकडे शेकडो सह्यांचे तीन स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केले. यावेळी प्रांताधिकारी कार्यालयात तक्रारकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान, डॉ. महाले यांनी दिलेल्या फिर्यादीत त्यांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आदी क्षेत्रांतील कार्य विशद करून म्हटले आहे, की अमळनेर येथील श्री मंगळदेव मंदिर मंडळ संदर्भात (नोंद क्र. A१०६९) बाबत मी न्यासाच्या कार्यकारी मंडळात झालेल्या बदलासंदर्भात चेंज रिपोर्ट मा. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव यांच्याकडे दाखल केलेला होता. त्यात पुराव्याचे शपथपत्र दाखल केले नाही या कारणास्तव माझा चौकशी अर्ज क्र. २४८/२०१३ निशाणी १ वरील बदल अहवाल अर्ज नामंजूर झालेला

पान २ वर



पोलीस प्रशासनाकडे तक्रार अर्ज देताना मंगळग्रह सेवा संस्थेचे कर्मचारी व मंदिर परिसरातील व्यावसायिक.

## सकल हिंदू समाज व हिंदुत्ववादी संघटनांची तक्रार

तक्रारीत म्हटले आहे, की आम्ही सर्व हिंदुत्ववादी संघटनांचे सदस्य तथा पदाधिकारी आहोत. आम्ही हिंदूधर्मीय असल्याने आमचे आमच्या हिंदू धर्मावर कमालीचे प्रेम आहे. भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्याविषयी देखील आमच्या मनात कमालीचा आदर आहे. आमच्या धर्माचा कोणीही अनादर केल्यास तसेच आमचे मठ, मंदिर, देवस्थाने आदींची कुणीही बदनामी केल्यास ते आम्ही कदापीही सहन करणार नाही. आपल्या शहरातील अनंत रमेश निकम, राहणार कोर्टाजवळ, अमळनेर हा सातत्याने हिंदू धर्म, मंदिरे, भाजप यांच्यासंदर्भात बदनामीकारक पोस्ट व्हायरल करीत आहे. त्यामुळे आमच्यासह अनेक हिंदू धर्मियांच्या भावना तीव्रतेने दुखावल्या आहेत. दीर्घकाळापासून आम्ही हे सारे काही सहन करीत आहोत. हिंदू असल्याने आम्ही संयमी व संहिष्णुवादी आहोत. याचा अर्थ आमच्या सहनशीलतेची कोणीही कितीही हद्दीपर्यंत परीक्षा पाहावी असे होत नाही. आता आमची सहनशक्ती संपली आहे. मात्र आम्ही भारताचे जबाबदार नागरिक असल्याने कायदा हातात न घेता आम्ही कायद्यालाच विनंती करीत आहोत, की अनंत निकम सामाजिक शांतता व सलोखा बिघडविण्याचे जे गंभीर प्रकार करीत आहे ते आपण तत्काळ थांबवावेत. त्याच्यावर कठोर कारवाई करावी. मुळातच अनंत निकमची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. आपण कितीही बेछूट व बेजबाबदारपणे वागलो तरी आपले काहीच होत नाही या अविर्भावात तो असतो. त्याच्या असंवेदनशील, मनमानी व बेजबाबदार कृत्यांमुळे मोठा उद्रेक झाल्यास त्यातून मोठे मोर्चे, आंदोलने होऊन सामाजिक शांतता बिघडल्यास त्यासाठी सर्वस्वी अनंत निकम व आपणच जबाबदार राहाल.

## मंगळग्रह सेवा संस्थेचे कर्मचारी व व्यावसायिकांची तक्रार

आम्ही सर्व सह्या करणारे मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांचे कर्मचारी आहोत. सदर संस्थेतर्फेच श्री मंगळग्रह मंदिराचे व्यवस्थापन केले जाते. संस्थेने केलेल्या विविध प्रकारच्या सामाजिक, पर्यावरणविषयक, आरोग्यविषयक, राष्ट्रीय उपक्रमात्मक, शैक्षणिक कार्य तसेच श्री मंगळग्रह मंदिराचे उत्कृष्ट व्यवस्थापन, नियोजन व विकासकामांमुळे दिवसेंदिवस संस्थेची व श्री मंगळग्रह मंदिराची कीर्ती देशात व देशाबाहेरही पसरली आहे. संस्थेला व मंदिराला महाराष्ट्र शासनासह अनेक प्रतिष्ठित संस्था व संघटनांचे अत्यंत बहुमानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. संस्थेला चार आयएसओ मानांकने आहेत. भारतीय टपाल विभागाने संस्थेच्या सन्मानार्थ स्पेशल पाकीट जारी केले आहे. असा बहुमान मिळविणारे खानदेशातील हे एकमात्र व राज्यातील दुसरेच मंदिर आहे. 'पर्यटन मित्र' हा शासनाच्या पर्यटन विभागातर्फे पुरस्कार मिळालेले राज्यातील एकमात्र मंदिर आहे. हे सारे काही मंगळग्रह सेवा संस्थेच्या स्वच्छ, पारदर्शक व नियोजनबद्ध कारभारामुळे बहुमान मिळाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले हे शहरातीलच नव्हे; तर राज्यातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आहे. अनेक प्रतिष्ठित संस्था व संघटनांवर ते अनेक प्रकारच्या बहुमानाच्या पदांवर कार्यरत होते व आहेत. त्यांच्याविरुद्ध आजपर्यंत कोणत्याही गुन्ह्याची नोंद नाही. ते गावात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस व प्रशासनालाही सर्वतोपरी सहकार्य करतात. खूप मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा करतात. पर्यावरणाबाबतही त्यांचे मोठे योगदान आहे. डॉ. डिगंबर महाले सर आमचे कुटुंबप्रमुख म्हणून ते आम्हाला अत्यंत आदरस्थानी आहेत. आम्हा सर्वांची ते अत्यंत जिव्हाळ्याने काळजी घेतात. असे असतानाही केवळ कुठल्या तरी द्वेषापोटी किंवा गैरहेतूने अनंत निकम याने सोशल मीडियाच्या माध्यमातून श्री मंगळग्रह मंदिर व डॉ. डिगंबर महाले यांची अत्यंत असह्य बदनामी केली आहे. या बदनामीमुळे मंदिरासह डॉ. डिगंबर महाले यांची प्रतिमा जनमानसांमध्ये खराब झाली आहे. मंदिरात भाविकांचे प्रमाण देखील कमी झाले आहे. अनेक भाविक आम्हाला अनंत निकमने केलेल्या बदनामीविषयी विचारणा करतात. त्यावेळी आम्हाला अत्यंत अपमानीत झाल्यासारखे वाटते. अनंत निकममुळे दिवसेंदिवस मंगळग्रह सेवा संस्थेची, श्री मंगळग्रह मंदिराची व डॉ. डिगंबर महाले यांची बदनामी वाढल्यास त्याचा विपरीत परिणाम थेट आमच्यावर होईल. आमचा संसार मंगळग्रह सेवा संस्था जो पगार देते त्याच्यावर चालतो. आम्ही सर्व हिंदू असल्याने

पान २ वर

## व्हॉईस ऑफ मीडियाची तक्रार

आम्ही सर्व देशातील क्रमांक १ ची व सर्वांत मोठी तसेच ७० हून अधिक देशांमध्ये कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे अर्थात व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी व सदस्य आहोत. मा. डॉ. श्री. डिगंबर महाले हे आमच्या संघटनेचे प्रदेश सरचिटणीस आहेत. आम्हा सर्वांसाठी आणि संस्थेसाठीही ते अत्यंत आदरणीय आहेत. या पदासाठी पात्र ठरण्यासाठी जी योग्यता लागते ती त्यांना सहजासहजी मिळालेली नाही. त्यासाठी त्यांनी ३५ वर्षे निष्कलंक, निष्पक्ष आणि निडर पत्रकारिता केलेली आहे. जनमानसामध्ये अत्यंत सन्मानाचे स्थान निर्माण केलेले आहे. वाणी आणि लेखणी यावर प्रभुत्व मिळविले आहे. तसेच ते अध्यक्ष असलेली मंगळग्रह सेवा संस्था व सदर संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिराला त्यांनी देशातच नव्हे; तर जगभरामध्ये प्रसिद्धी आणि कीर्ती मिळवून दिली आहे. मा. डॉ. श्री. महाले यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, पर्यावरणविषयक आणि पत्रकार म्हणून खूप मोठे व प्रदीर्घ कार्य आहे. मात्र, अमळनेर शहरातील अनंत निकम या वादग्रस्त व गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने द्वेष भावनेने

पान २ वर

## निकममध्ये नैतिक क्षमता आहे काय?

शेकडो तक्रारदारांनी आपल्याविरुद्ध पोलीस आणि प्रशासनाकडे तक्रारी केल्याचे निकमला कळाले असावे. सदर घटना धार्मिक बाबींशी निगडीत असल्याने कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याने याबाबतच्या बातम्या प्रसिद्ध होतील, या अंदाजाने निकम याने फेसबुकवर पोस्ट करून माझी प्रतिक्रिया घेतल्याशिवाय पत्रकारांनी एकतर्फी बातम्या प्रसिद्ध करू नये, असे आवाहन केले आहे. प्रत्यक्षात श्री मंगळग्रह मंदिर, डॉ. डिगंबर महाले व न्यायालयाच्या निकालाची छेडखानी करण्यापूर्वी निकमने सद्सद्विवेक बुद्धी वापरून डॉ. महाले आणि जाणकार कायदेतज्ज्ञाची प्रतिक्रिया घेतली असती, तर आज ही वेळच आली नसती. कोणाचीही बदनामी करण्यापूर्वी संबंधिताची प्रतिक्रिया न घेता थेट बेछूट आरोप करण्याची बेदरकार स्टाईल वापरणाऱ्या निकमला माझी प्रतिक्रिया घ्या. एकतर्फी बातमी प्रसिद्ध करू नका, असे आवाहन करण्याची नैतिक क्षमता आहे काय? असा प्रश्न पत्रकारांमध्ये उपस्थित होत आहे.

## धर्मदाय विभागाकडे आज सर्व पुराव्यांनिशी तक्रार होणार दाखल

निकमच्या बदनामीकारक पोस्टच्या पार्श्वभूमीवर डॉ. डिगंबर महाले यांनी त्यांच्या वकिलांसह जळगाव येथील मे. धर्मदाय उपायुक्त, मे. धर्मदाय सहाय्यक आयुक्त व कार्यालय अधीक्षक यांची भेट घेऊन तोंडी तक्रार केलीच आहे. संबंधितांनीही त्याबाबत आम्ही गंभीर असल्याचे सांगितले आहे. दरम्यान, मंगळवार, दि. १४ जुलै रोजी निकमचे सर्व बेकायदेशीर कारनामे डॉ. महाले सज्जड पुराव्यांनिशी दाखल करणार आहेत. खरेतर कोणतेच न्यायालय कोणत्याही पद्धतीच्या निकालाची प्रेसनोट प्रसिद्ध करीत असल्याचे कधीही ऐकिवात नाही. थेट न्यायालयाच्या नावाचा वापर करून व बनावट प्रसिद्धी पत्र प्रसिद्ध करून तथा त्याचे कथन करून मोठे धर्मस्थळ आणि प्रतिष्ठित व्यक्तीला बदनाम करण्याचा न्यायालयीन क्षेत्रात हा पहिलाच प्रकार असल्याचे अनेक जाणकारांनी सांगितले. त्यामुळे न्यायालयीन क्षेत्रात मोठी खळबळ माजली आहे. या गैरप्रकाराचे पुढे काय होते, याकडे अनेकांचे लक्ष लागून आहे.

## संपादकीय

# लोकसंख्येचा गुणात्मक गुणाकार हवा

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश मानला जातो. दोन वर्षांपूर्वीच जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून चीनचा उल्लेख व्हायचा. मात्र, आता भारतातील लोकसंख्या सर्वाधिक ठरते. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीप्रमाणे ही संख्या १४५ कोटी असल्याचे म्हटले जाते. २०११ च्या जनगणनेनंतर भारताची लोकसंख्या वेगाने वाढलेली आहे. आताच्या म्हणजेच देशभर सुरू असलेल्या जनगणनेनंतर ही लोकसंख्या १५५ कोटींवर जाण्याची शक्यता आहे. १९५२ पासून भारताने लोकसंख्या नियंत्रणात आणण्याच्या दिशेने कुटुंब नियोजनाचा उपक्रम सुरू केला. काही प्रमाणात त्याचा परिणाम दिसून आला. परंतु अपेक्षेप्रमाणे लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यात भारताला यश आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून भारतापेक्षा अनेक दृष्टींनी विकसित असलेल्या चीनने आपली लोकसंख्या नियंत्रणात आणण्यात यश मिळविले आणि चीनला मागे टाकून भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश ठरतो आहे. कोणत्याही देशाला आपल्या लोकसंख्येचा काही ना काही प्रमाणात अभिमान असतो. परंतु या लोकसंख्येच्या जीवनमानाचा किंवा या लोकसंख्येच्या किमान गरजांची पूर्तता होईल याकडेसुद्धा लक्ष द्यावे लागते. विशेषतः जगातील विकसित राष्ट्रांनी आपल्याकडील लोकसंख्येचा एक सशक्त मनुष्यबळ म्हणून उपयोग करून घेतला. प्रत्येक व्यक्तीचा जीवनस्तर उंचावण्याच्या दृष्टीने आणि लोकसंख्या नियंत्रित ठेवण्यावर तितकाच भर दिला. भारतात याउलट परिस्थिती आहे. मनुष्यबळ म्हणून तर या लोकसंख्येचा विचारच झाला नाही. उलट ही लोकसंख्या म्हणजे देशाच्या सगळ्याच व्यवस्थांवरील भार किंवा ओझे असल्याचेच मानले गेले. किमान गरजांची पूर्तता करण्याकडेसुद्धा गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही. स्वाभाविकपणे देशाची साक्षरताही वाढू शकलेली नाही. शिवाय कृषीप्रधान देश असूनही शेतीच्या विकासाकडे किंवा शेतीकडे उद्योग म्हणून लक्ष दिले गेले नाही. परिणामी लोकसंख्येच्या तुलनेमध्ये अपेक्षित असा रोजगार निर्माण होऊ शकला नाही.

आज जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश असूनही साक्षरतेचे प्रमाण ७५ टक्केसुद्धा झालेले नाही. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली, पण एकूण साक्षरता ७५ टक्क्यांपर्यंत आणण्यात सरकारला यश आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. यातील काहीसा विरोधाभास असा आहे, की भारताच्या लोकसंख्येत सध्या पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण जास्त आहे. असे असूनही साक्षरतेमध्ये मात्र महिलांचे प्रमाण केवळ ६४ ते ६५ टक्के आहे. पुरुष साक्षरतेचा दर हा ८० टक्क्यांपर्यंत आहे. ही आकडेवारी जरी २०११ च्या जनगणनेप्रमाणे असली तरी नंतरच्या कालावधीत वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता साक्षरतेचा दर उल्लेखनीयरित्या वाढू शकलेला नाही. परिणामी भारतातील लोकसंख्येत सर्वाधिक प्रमाणात असलेला युवक पुरेसा रोजगार मिळवू शकत नाही. आज लोकसंख्येत पस्तीस वयोगटाच्या तरुणांची संख्या ६५ टक्के आहे. पण यातील ४० टक्के तरुण बेरोजगार असल्याचे सांगितले जाते. आज जागतिक स्तरावर भारत हा विकसनशील देश म्हटला जातो. २०४७ पर्यंत भारताला विकसित देश म्हणून स्वतःला स्थापित करायचे आहे. परंतु सर्वाधिक लोकसंख्येत युवकांचा सर्वाधिक वाटा असूनही या युवकांबाबत अधिक रोजगाराभिमुख धोरणे आखण्याची बुद्धी सरकारला झाली नाही.

अजूनही शहरी आणि ग्रामीण रोजगारामध्ये प्रचंड मोठी तफावत दिसून येते. किंबहुना ग्रामीण भागात रोजगारच नसल्याने त्या भागातील तरुण शहरांकडे धाव घेतात आणि शहरांमध्ये पुरेशा साधनसुविधा नसल्याने या शहरांना लोकसंख्या वाढीमुळे बकालपणाही येतो आहे. म्हणजेच आजच्या जागतिक लोकसंख्या दिनाचा विचार करत असताना भारताला केवळ लोकसंख्या नियंत्रणाचा विचार करून चालणार नाही. तर या लोकसंख्येचा गुणात्मक गुणाकार करावा लागेल. तरच २०४७ पर्यंत भारतातील युवक हा विकसित राष्ट्रांप्रमाणे स्वयंपूर्ण होऊ शकेल. बेरोजगारी, नैराश्य, शहरांमधील ताणतणाव या सगळ्यांमध्ये आत्महत्या करणाऱ्या तरुणांची संख्यादेखील चिंताजनक झालेली आहे. भारतात काही प्रमाणात लोकसंख्यावाढीचा वेग कमी होतो आहे. मात्र त्याबरोबरच देशाच्या समाज आणि कुटुंब व्यवस्थेमध्ये मोठे बदल घडून येत आहेत. वयाची साठी ओलांडणाऱ्यांनी मोठे आणि एकत्र कुटुंब पद्धतीचा अनुभव घेतला होता. आज मात्र कुटुंब छोटे ठेवण्याकडेच सर्वांचा कल असतो. याची कारणेही तितकीच गंभीर स्वरूपाची आहेत. लोकसंख्यावाढीचा पुढच्या वीस-पंचवीस वर्षांचा विचार केला तर भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्यादेखील २५ टक्क्यांनी वाढणार आहे. म्हणजे हळूहळू युवकांची संख्या घटत जाईल आणि ज्येष्ठांची संख्या वाढत जाईल. भविष्यातील वाढत जाणाऱ्या या ज्येष्ठांचा आतापासूनच विचार करणे सरकारसाठी क्रमप्राप्त ठरते. अनेक विकसित राष्ट्रांमध्ये ज्येष्ठांची देखभाल करण्यासाठी बराच प्रयत्न करावा लागतो. एवढेच नव्हे तर त्या त्या देशांच्या अंदाजपत्रकांमध्ये ज्येष्ठांना निवृत्तीवेतनही द्यावे लागते. आज लोकसंख्येत सर्वाधिक मोठा असलेला भारत पन्नास वर्षांनी जगातील सर्वाधिक ज्येष्ठ नागरिकांचा देश म्हणूनही ओळखला जाईल.

# आगीच्या भीषण घटनेनंतर अवघ्या काही दिवसांत संत श्री सखाराम महाराज मंदिर भाविकांसाठी खुले

## सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ श्रमदानातून मिळाली नवसंजीवनी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सुमारे अडीचशेवर वर्षांचा इतिहास असलेल्या येथील संत श्री सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी वाडी संस्थानातील मुख्य मंदिरास बुधवार, दि. १ जुलै रोजी शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली होती. त्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले होते. मात्र, या मंदिराला सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ श्रमदानातून नवसंजीवनी मिळाली आहे. रंगरंगोटी, स्वच्छता, तात्पुरते शेड उभारणे, विद्युत दुरुस्ती आणि सुशोभीकरणाची विविध कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आल्याने आषाढी एकादशीपूर्वीच मंदिर पुन्हा भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले आहे.

या मंदिरातील सीसीटीव्ही यंत्रणेत शॉर्टसर्किट होऊन लागलेल्या भीषण आगीत मंदिराचे लाकडी छत, नक्षीदार खांब आणि शेड पूर्णपणे जळून खाक झाले. अमळनेर, पारोळा, चोपडा, धरणगाव आणि शिरपूर येथील अग्नीशमन दलाच्या जवानांसह हिंदू-मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे अथक प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. सुदैवाने सर्व मूर्ती सुरक्षित राहिल्या. या घटनेमुळे मंदिरात तब्बल एक ते दीड फूट कोळसा, राख आणि गाळ साचला होता. वीजतारा जळाल्या होत्या, तर भिंतींवर धुराचे काळे डाग पडले होते. त्यामुळे काही दिवस मंदिर भाविकांसाठी बंद ठेवण्यात आले होते. दरम्यान, प. पू. प्रसाद महाराज आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे रवाना झाल्याने आषाढी एकादशीच्या दिवशी मंदिर बंद राहण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, वारीतूनच प. पू. प्रसाद महाराज यांनी मंदिर दर्शनासाठी पूर्ववत करण्याचे निर्देश दिल्यानंतर अनेक सामाजिक संस्था आणि कार्यकर्ते एकत्र आले. प्रसाद माऊली ग्रुप, माऊली मित्रमंडळ (वाडी चौक), दत्त भजनी मंडळ यांच्यासह विनोद महाजन, संजय पाटील, दिलीप पाटील, गणेश महाजन, आबा मिस्त्री, विजय लायटिंगवाला, दिलीप कोळी, अशोक मिस्त्री, पिंटू जाधव, पंकज पाटील, केतन जोशी, मनोज देवकर, मनोज भांडारकर, मनोहर महाजन, उदय देशपांडे, महेश दुसाने, मोईद्दीन मिस्त्री, संजय भांडारकर, नंदकिशोर मराठे, दगडू पाटील, कमलेश महाजन, भाऊ मराठे आणि विलास चौधरी यांनी राजेंद्र भामरे, महेश कोठावदे, दिलीप देशमुख, सुनील देव आणि सखा हरी देव यांच्या मार्गदर्शनाखाली निःस्वार्थपणे श्रमदान केले. या कार्यकर्त्यांनी संपूर्ण मंदिर धुवून स्वच्छ केले. सुमारे चार ट्रॅक्टर कोळसा व गाळ बाहेर काढला, मंदिराची रंगरंगोटी केली, छतावर तात्पुरते शेड उभारले, विद्युत दुरुस्ती करून नवीन फिटिंग केले. तसेच मंदिराचे आकर्षकरित्या सुशोभीकरण केले. त्यामुळे अवघ्या काही दिवसांत मंदिर भाविकांना दर्शनासाठी पुन्हा खुले झाले आहे.

आषाढी एकादशी आणि द्वादशीच्या निमित्ताने येथे दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मंदिर पुन्हा दर्शनासाठी खुले झाल्याने भाविकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सामाजिक बांधिलकीचे हे कार्य सर्वांसाठी कौतुकास्पद ठरत आहे.



*अमळनेर : आगीच्या भीषण घटनेनंतर अवघ्या काही दिवसांत भाविकांना दर्शनासाठी खुले झालेले संत श्री सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी वाडी संस्थानातील मुख्य मंदिर.*

# खोकरपाटच्या सरपंचांची भाजपला सोडचिठ्ठी; 'राष्ट्रवादी'त प्रवेश

## नवनियुक्त सरपंच नितीन पाटील यांनी स्वीकारला पदभार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील खोकरपाट-बहादरवाडी ग्रुप ग्रामपंचायतीचे नवनियुक्त सरपंच नितीन पाटील यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वी भारतीय जनता पक्ष व माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांची साथ सोडत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजितदादा पवार गट) प्रवेश केला. अनेक वर्षे भाजपमध्ये सक्रिय राहिल्यानंतर त्यांनी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार अनिलदादा भाईदास पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

तत्पूर्वी, सरपंच रमेश पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या जागेचा नवनियुक्त सरपंच नितीन पाटील यांनी पदभार स्वीकारला. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शेतकी संघाचे संचालक रणजीत पाटील, हेमंत पवार, जितेंद्र ठाकूर, दिनेश पाटील (पिंपळे), माजी सरपंच अलीम मुजावर, एल. टी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये नवनियुक्त सरपंच नितीन पाटील, सोसायटीचे नवनियुक्त चेअरमन मानसिंग पाटील, रामकृष्ण पाटील, विकास पाटील, श्रीराम पाटील, विशाल पाटील, भाऊसाहेब पाटील आणि राजेंद्र पाटील यांचा समावेश होता. कार्यक्रमाप्रसंगी उत्तम भाऊसाहेब पाटील, रमेश पाटील, रामसिंग पाटील, बापू पाटील, अंबालाल पाटील, संजय पाटील, विजयसिंह पाटील, प्रदीप पाटील यांच्यासह असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार अनिलदादा पाटील यांनी उपस्थितांशी संवाद साधताना नव्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. खोकरपाट-बहादरवाडी परिसरातील विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. तसेच विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही दिली. या पक्षप्रवेशामुळे खोकरपाट-बहादरवाडी परिसरातील राजकीय समीकरणांमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाल्याची चर्चा असून, राष्ट्रवादी काँग्रेसला स्थानिक पातळीवर मोठे बळ मिळाल्याचे बोलले जात आहे.



*अमळनेर : तालुक्यातील खोकरपाट-बहादरवाडी ग्रुप ग्रामपंचायतीचे नवनियुक्त सरपंच नितीन पाटील यांच्यासह सोसायटीचे नवनियुक्त चेअरमन मानसिंग पाटील, रामकृष्ण पाटील, विकास पाटील, श्रीराम पाटील, विशाल पाटील, भाऊसाहेब पाटील आणि राजेंद्र पाटील यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजितदादा पवार गट) स्वागत करताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शेतकी संघाचे संचालक रणजीत पाटील, हेमंत पवार, जितेंद्र ठाकूर, दिनेश पाटील (पिंपळे), माजी सरपंच अलीम मुजावर, एल. टी. पाटील आदी.*

# 'पांझरा'वर केटीवेअर बंधारे उभारण्यासह रस्त्यांचे तत्काळ काँक्रीटीकरण करा

## अमळनेर तालुक्यातील ग्रामस्थांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री ना. गुलाबराव पाटील यांची नुकतीच जळगावात भेट घेऊन पांझरा नदीवरील मांडळ, मुडी आणि शहापूर परिसरात केटीवेअर बंधारे उभारणे तसेच अमळनेरपासून ढेकू, शिरसाळे, तरवाडे, वावडे, मांडळ व मुडी या मार्गावरील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरणाचे (ट्रिमिक्स) काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी संबंधित गावांच्या ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की पांझरा नदीवर केटीवेअर बंधारे उभारल्यास पावसाचे पाणी प्रभावीपणे अडविले जाईल. त्यामुळे भूजल पातळीत वाढ होऊन परिसरातील शेतकरी, नागरिक तसेच पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांना मोठा फायदा होईल. भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी हे बंधारे महत्त्वाचे ठरणार आहेत. तसेच अमळनेर, ढेकू, शिरसाळे, तरवाडे, वावडे, मांडळ व मुडी या मार्गावरील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण (ट्रिमिक्स) दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावे.

यावेळी माजी पंचायत समिती सभापती डॉ. दीपक पंढरीनाथ पाटील तसेच धुळे जिल्ह्यातील शिवसेना नेते हिलाल माळी आदी उपस्थित होते. निवेदनाची दखल घेत पालकमंत्री ना. पाटील यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत प्रस्तावित विकासकामे तातडीने मार्गी लावण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या कामांमुळे परिसरातील भूजल पातळीत वाढ होऊन पाणीटंचाई कमी होण्यास मदत होईल, तसेच नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि टिकाऊ रस्त्यांची सुविधा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.



*अमळनेर : जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री ना. गुलाबराव पाटील यांची नुकतीच जळगावात भेट घेऊन पांझरा नदीवरील मांडळ, मुडी आणि शहापूर परिसरात केटीवेअर बंधारे उभारणे तसेच अमळनेरपासून ढेकू, शिरसाळे, तरवाडे, वावडे, मांडळ व मुडी या मार्गावरील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण (ट्रिमिक्स) तातडीने व्हावे, या मागणीचे निवेदन देताना संबंधित गावांचे ग्रामस्थ. शेजारी माजी पंचायत समिती सभापती डॉ. दीपक पाटील व धुळे जिल्ह्यातील शिवसेना नेते हिलाल माळी.*

# अनंत निकमविरुद्ध पोलीस व प्रशासनाकडे केल्या सामूहिक तक्रारी

**पान १ वरून**

आहे. सदर निकाल दि. ०२/०६/२०२६ रोजी लागलेला असून त्याविरुद्ध आम्ही अपील देखील दाखल केलेले आहे. असे असताना दि. २९/०६/२०२६ रोजी आरोपी अनंत रमेश निकम याने त्याच्या व्हॉटस्‌ॲप, फेसबुक अकाऊंटवर एक व्हिडिओ प्रसिद्ध करून त्यात अमळनेरच्या श्री मंगळग्रह मंदिरावर ताबा मिळविण्याचा बेकायदेशीर कट उधळला! १३ वर्षांनंतर न्यायदेवतेचा ऐतिहासिक निकाल; खोट्या विश्वस्तांचा फेरफार अर्ज सपशेल फेटाळला! मुळासकट उपटून फेकला! असे सांगितले आहे. तसेच यासंदर्भात निकम याने अधिक स्पष्टीकरण देताना मी दाखल केलेल्या अर्जासंदर्भात वस्तुस्थितीदर्शक कोर्टाच्या निकालाची सत्य माहिती न देता पूर्णतः खोटी कपोलकल्पीत माहिती दिली. सदर व्हॉट्सॲप व्हिडिओचा ०.३०.४२ सेकंदापासून पुढे पाहिले असता त्यात न्यायालयाचा धारदार कडक ताशेरे (Findings) या सदराखाली आरोपी अनंत निकम याने मी (फिर्यादी) खऱ्या फेरफार (अर्ज क्र. ४९६/२०१३)ची न्यायालयापासून जाणूनबुजून माहिती लपवून ठेवली व न्यायालयाची दिशाभूल करण्याचा गंभीर गुन्हा केला तसेच दि. २८/०२/२०१३ रोजी कुठलीही न्यासाची वैध सभा झाली नव्हती. मी (फिर्यादी) केवळ बनावट कागद तयार करून खोट्या स्वाक्षऱ्यांचा आधार घेतला. तसेच

✻ **सत्य लपवले आणि फसवणूक केली :** अर्जदाराने (म्हणजे मी) मूळ न्यासाने दाखल केलेल्या खऱ्या फेरफार अर्जाची (४९६/२०१३) माहिती न्यायालयापासून जाणूनबुजून लपवून ठेवली आणि न्यायालयाची दिशाभूल करण्याचा गंभीर गुन्हा केला.

✻ **कागदपत्रांची बनावटगिरी :** २८ फेब्रुवारी २०१३ रोजी न्यासाची कोणतीही वैध सभा झाली नव्हती. अर्जदाराने केवळ कागदावर बनावट ठराव तयार करून खोट्या स्वाक्षऱ्यांचा आधार घेतला.

✻ **एकही पुरावा नाही :** गेल्या १३ वर्षांत स्वतःला खरे सिद्ध करण्यासाठी अर्जदाराला न्यायालयात एकही पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (Affidavit Evidence) सादर करता आले नाही.

✻ **अधिकारशून्य कारभार :** डिगंबर महाले यांना श्री मंगळदेव मंदिर मंडळ या न्यासाच्या वतीने कोणताही फेरफार अहवाल किंवा अर्ज सादर करण्याचा काडीमात्र कायदेशीर अधिकार नव्हता, असे पूर्णतः असत्य व माझी बदनामीकारक तसेच वरील मुद्दे सहाय्यक धर्मदाय आयुक्तांच्या निकालात कुठेही नसताना मे. न्यायालयाच्या निकालाशी छेडखानी करणारे कथन केले आहे.

वास्तविक फेरफार अर्ज क्र. २४८/२०१३ जो मी अगोदर दाखल केलेला आहे व फेरफार अर्ज क्र. ४९६/२०१३ एकत्रित चालविण्यात यावे, अशी मी. मे. सहा. धर्मदाय आयुक्त सो. यांनी नि. २१ चा अर्जानुसार विनंती केलेली होती. त्यामुळे सत्य लपविले असे आरोपी अनंत निकम याचे म्हणणे पूर्णतः खोटे आहे. तसेच न्यायालयाच्या नावाने व्हॉटस्‌ॲप, फेसबुकद्वारे केलेल्या कथनाचा कोर्टाने त्यांच्या आदेशात कुठेही उल्लेख केलेला नाही. मात्र केवळ माझी समाजात बदनामी व्हावी तसेच मंगळग्रह सेवा संस्था व श्री मंगळग्रह मंदिर बदनाम व्हावे व गावात अशांतता व्हावी. तसेच भाविकांमध्ये संभ्रम निर्माण व्हावा या दुष्ट उद्देशाने आरोपी अनंत निकम याने न्यायालयाच्या नावे खोटे आरोप केलेले आहेत.

अनंत निकम याने सदर बाबतीत अमळनेरच्या मंगळग्रह मंदिरावर ताबा मिळविण्याचा बेकायदेशीर कट उधळला! १३ वर्षांनंतर न्यायदेवतेचा ऐतिहासिक निकाल; खोट्या विश्वस्तांचा फेरफार अर्ज सपशेल फेटाळला! आदी मजकूर असलेली सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाचे मा. मुख्य जनसंपर्क अधिकारी/अधीक्षक यांच्या नावे प्रेसनोट प्रसिद्ध केली.

डॉ. महाले यांनी मे. धर्मदाय उपायुक्त, मे. धर्मदाय सहाय्यक आयुक्त आणि **मा. मुख्य जनसंपर्क अधिकारी/अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव विभाग, जळगाव** यांना सदर पत्रक त्यांनी प्रसिद्ध केलेले आहे काय? अशी चौकशीत्मक विचारणा केली असता त्यांनी असे कुठलेही पत्रक प्रसिद्ध केलेले नाही, असे स्पष्ट केले. विशेष म्हणजे सदरचे प्रसिद्धी पत्रक अनंत निकम किंवा त्याच्या निकटवर्तीयांनी पत्रकारांना प्रेसनोट म्हणून देखील व्हॉटस्‌ॲपला पाठविलेले आहे व त्याचा व्हिडिओ देखील पाठविलेला आहे. सदरच्या व्हॉटस्‌ॲप व्हिडिओ संदर्भात अनेक लोकांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. त्यावरून सदर बाब ही सार्वजनिक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचा, मला व श्री मंगळग्रह मंदिराला बदनाम करण्याचा आरोपीचा दुष्ट व विकृत उद्देश स्पष्टपणे दिसून येतो. सदर चेंज रिपोर्टसंदर्भात अनंत निकम याने सोशल मीडिया व खोट्या प्रेसनोटच्या माध्यमातून केवळ चेंज रिपोर्ट अमान्य झालेला असताना कोर्टाच्या नावे वर नमूद केल्याप्रकारे खोटे (Findings) लोकांमध्ये प्रसारीत व प्रसिद्ध करून बेकायदेशीरपणे कोर्ट आदेशाचा चुकीचा अर्थ लावून माझी व श्री मंगळग्रह मंदिराची बदनामी केली आहे. श्री मंगळग्रह मंदिर तथा मंगळग्रह सेवा संस्थेला शासनाचे व अन्य प्रतिष्ठित संस्थांचे अत्यंत सन्मानाचे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. सदर मंदिर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. शेकडो जण सदर मंदिरावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या उपजीविका भागवितात. मंदिराच्या बदनामीमुळे या सर्वांना भावनिक व आर्थिक ठेच पोहोचली आहे. आरोपी निकम याचा या गैरप्रकारामागे कलुषित भावनेने माझी व श्री मंगळग्रह मंदिराची बदनामी व्हावी, शहरात अशांतता निर्माण व्हावी, हा उद्देश स्पष्टपणे दिसून येतो. त्याची एकूणच गुन्हेगारी व उपद्रवी पार्श्वभूमी पाहता त्याच्यावर योग्य ती कडक कायदेशीर कारवाई करून शहरातून हद्दपारसारखी किंवा इतर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

## व्हॉईस ऑफ मीडियाची तक्रार

**पान १ वरून :** किंवा कुठल्यातरी गैरहेतूने मा. डॉ. श्री. महाले सर व श्री मंगळग्रह मंदिर यांची बदनामी करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केल्या आहेत. त्यामुळे मा. डॉ. श्री. महाले सर व श्री मंगळग्रह मंदिर दोघांच्याही प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. ही बाब आम्हालाही अपमानित करणारी तसेच जबर मानसिक धक्का देणारी आहे. कुठलाही अधिकार नसताना एखादी व्यक्ती न्यायालयाच्या निर्णयाशी छेडछाड करून कोणालाही आणि कोणत्याही मोठ्या धर्मस्थानाला कोणत्या हिमतीवर बदनाम करू शकतो? त्याला कायद्याचा धाक का वाटत नाही? असे प्रश्न पत्रकार म्हणून आम्हाला पडले आहेत. अनंत निकमची ही बेकायदेशीर, अनिर्बंध वृत्ती आणि मुजोर प्रवृत्ती याला कायाद्याचा चाप बसणे गरजेचे आहे. आमची आपणास नम्र विनंती आहे, की अनंत निकम सोशल मीडियाचा करीत असलेल्या गैरवापरावर तत्काळ प्रतिबंध करावा. तसेच त्याच्यावर कठोर कारवाई करावी. अन्यथा याविरुद्ध राज्यभर आमची संघटना आंदोलन छेडेल. त्यासाठी सर्वस्वी अनंत निकम आणि आपणच जबाबदार राहाल.

## मंगळग्रह सेवा संस्थेचे कर्मचारी व व्यावसायिकांची तक्रार

**पान १ वरून :** आमचे आमच्या धर्मावर आणि श्री मंगळग्रह मंदिरावर अपार श्रद्धा आहे. अनंत निकम याच्या पोस्टमुळे आम्ही धार्मिकरित्याही दुखावले गेलो आहोत. हल्ली प्रचंड बेरोजगारी आहे. मंगळग्रह सेवा संस्थेच्या माध्यमातून आमचे संसार स्थिरावले आहेत. आमच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची व आरोग्याची सोय झालेली आहे. अनंत निकम याच्या या बेजबाबदार वागण्यामुळे आम्ही सर्वजण चिंतेत आहोत. अशा समाजविघातक प्रवृत्तीवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. सदरची निवेदने तहसीलदार रूपेशकुमार सुराणा व पोलिसांच्या गोपनीय शाखेचे सिद्धांत शिसोदे यांनी स्वीकारली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



## पुणेकर युवकाच्या लढ्याला यश!

# हँडलिंग चार्जेस आकारणाऱ्या इलेक्ट्रिक कंपनीला शिकवला कायद्याचा धडा, शोरूम १५ दिवसांसाठी बंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवीन गाडी आपल्या दारात येणे, हा आपल्या सगळ्यांसाठीच एक स्वप्नपूर्तीचा आणि खूप आनंदाचा क्षण असतो. आपण आपल्या कष्टाचा पै अन् पै जमा करून ती गाडी खरेदी करतो. पण कधी-कधी याच आनंदाच्या भरात असताना आपली फसवणूक होते हे आपल्या लक्षातही येत नाही.

गाडी खरेदी करताना मोठ्या कंपन्या वेगवेगळ्या नावाखाली आपल्याकडून जास्तीचे पैसे उकळतात. "आता नवीन गाडी घेतोय, कशाला उगाच वाद घालायचा?" असे म्हणून आपण अनेकदा या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो आणि निमूटपणे ते पैसे देऊन टाकतो. पण पिंपरी-चिंचवडच्या भोसरीतील इंद्रायणीनगरमध्ये राहणाऱ्या संदेश संजय थोरवे या युवकाने मात्र असे केले नाही. त्याने या फसवणुकीविरुद्ध आवाज उठवला. आपल्या कृतीतून त्यांनी दाखवून दिले की जर ग्राहक सजग आणि जागरूक असेल, तर सर्वसामान्य नागरिक एका मोठ्या इलेक्ट्रिक गाडीच्या कंपनीलाही कायदेशीर धडा शिकवू शकतो. संदेशने नेमके काय केले ते सविस्तरपणे जाणून घेऊया.

**असा सुरू झाला लढा**

जुलै २०२४ मध्ये संदेश संजय थोरवे ने एक इलेक्ट्रिक गाडी घेण्याचे ठरविले. निसर्गाला आपल्यामुळे त्रास होऊ नये, म्हणून त्यांनी वाकडमधील ओबेन इलेक्ट्रिक बाईक शोरूममधून एक बाईक बुक केली आणि सर्व पैसे ऑनलाईन भरले. पण जेव्हा गाडीचे बिल आणि कागदपत्रे आली, तेव्हा संदेश यांनी ती खूप काळजीपूर्वक वाचली. त्या बिलामध्ये 'हँडलिंग चार्जेस' नावाचा एक अतिरिक्त खर्च लावलेला त्यांना दिसला.

**काय आहेत हे 'हँडलिंग चार्जेस'?**

नवीन गाडी कारखान्यातून



शोरूममध्ये आणण्याचा खर्च म्हणजे हँडलिंग चार्जेस. मोटार वाहन कायदा १९८८ मध्ये हँडलिंग चार्जेस आकारण्याची कोणतीही तरतूद नाही. पण ते आकारल्यास ग्राहक संरक्षण कायदा २०१९ नुसार ते बेकायदेशीर मानले जाते. संदेश यांनी कंपनीला ईमेल करून याबद्दल विचारले. त्यावर कंपनीने, "तुम्ही निश्चित राहा! आम्ही सरकारच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत आहोत." असे सांगून पुरावे देण्यास नकार दिला.

**माहितीच्या अधिकाराचा वापर**

कंपनीच्या अशा उत्तराने संदेश यांचे समाधान झाले नाही. त्यांनी माहितीच्या अधिकाराचा वापर केला. तिथून त्यांना शासन परिपत्रक आणि परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र मिळाले. त्यात स्पष्ट लिहिले होते की, गाडीच्या कर आणि नोंदणी शुल्काशिवाय कोणताही जादा खर्च घेणे गुन्हा आहे. असे करणाऱ्या शोरूमवर थेट फौजदारी कारवाई होऊ शकते.

**थेट सरकारकडे तक्रार**

हा मोठा पुरावा हाती आल्यावर संदेश यांनी सर्व कागदपत्रे गोळा केली. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या अन्यायाविरुद्ध लेखी तक्रार केली. या तक्रारीची शासनाने अतिशय वेगाने आणि गंभीर दखल घेतली. परिवहन आयुक्त आणि आरटीओ कार्यालयाने या प्रकरणाची सविस्तर चौकशी केली. कायद्याचे उल्लंघन केल्याचे समोर आल्यामुळे अखेर परिवहन आयुक्त विभागाने त्या कंपनीचे पुण्यातील वाकड येथील शोरूम १५ दिवसांसाठी बंद करण्याचे आदेश दिले. त्यानुसार शोरूमचे व्यवसाय प्रमाणपत्र १५ दिवसांकरिता निलंबित करण्यात आले.

**मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आभार**

यानंतर संदेश थोरवे कृतज्ञता व्यक्त करत म्हणाले, "माझी मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री महोदयांशी वैयक्तिक कोणतीही ओळख नव्हती. तरीही त्यांनी माझ्यासारख्या एका सामान्य नागरिकाचा आवाज ऐकला आणि तातडीने योग्य ती कारवाई केली. सर्वसामान्य माणसाला न्याय दिल्याबद्दल मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे तसेच पोलीस प्रशासनाचे देखील मनापासून आभार मानतो."

**ग्राहकांनो, जागरूक राहा!**

मोठ्या कंपन्या अनेकदा ग्राहकांना गृहीत धरतात. आपण जागरूक नसतो, म्हणूनच त्या आपली फसवणूक करतात. आपण प्रत्येक खरेदीचे बिल नीट तपासले पाहिजे. अन्याय होत असेल तर शांत न बसता त्याविरोधात आवाज उठवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, तरच ग्राहक खऱ्या अर्थाने राजा बनेल. कायम जागरूक राहा, सजग राहा!

# पावसाळ्यात लहान मुलांना आजारपणापासून कसे वाचवाल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पावसाळ्यात आजार अधिक प्रमाणात पसरतात. लहान मुले आणि प्रौढ दोघांनाही याचा सहज संसर्ग होऊ शकतो. स्वच्छतेच्या काही टिप्स पाळून हे टाळता येते. पावसाळ्यात मोकळ्या जागांमध्ये पाणी साचते आणि आर्द्रता वाढते. यामुळे डास आणि इतर जंतूंची संख्याही वाढते. मुले मोकळ्या जागेत खेळायला जातात आणि अनेकदा पावसात भिजतात. या सर्वामुळे त्यांना संसर्ग होण्याचा धोका वाढतो. यामुळे त्वचेचे संक्रमण, न्यूमोनिया, सर्दी आणि छातीचे संक्रमण होऊ शकते. या समस्या टाळण्यासाठी, पावसाळ्यात आपल्या मुलांची विशेष काळजी घ्या.

ऋतू बदलत असताना पालकांनी आणि काळजी वाहकांनी मुलांना संभाव्य संसर्गापासून वाचवण्यासाठी सतर्क राहिले पाहिजे. काही खबरदारी घेऊन तुम्ही तुमच्या लहान मुलांना निरोगी आणि सुरक्षित ठेवू शकता.

**हात धुण्याची सवय लावा**

जंतूचा प्रसार रोखण्यासाठी, वारंवार हात धुणे महत्त्वाचे आहे. मुले खेळताना विविध पृष्ठभागांना स्पर्श करतात, ज्यामुळे विविध जंतू त्यांच्या हातांना चिकटू शकतात. हे जंतू नंतर त्यांच्या तोंडातून आणि नाकातून श्वासावाटे आत जाऊन त्यांना आजारी पाडू शकतात. तुमच्या मुलांना नियमितपणे, विशेषत: जेवणापूर्वी आणि शौचालय वापरल्यानंतर किंवा बाहेर खेळल्यानंतर, साबण आणि पाण्याने हात स्वच्छ धुवायला शिकवा. धूळ लागलेल्या कोणत्याही वस्तूंना स्पर्श केल्यानंतरही हात धुणे महत्त्वाचे आहे.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवा**

आपल्या मुलांच्या रोजच्या आहारात संतुलित आणि पौष्टिक आहाराचा समावेश केल्याने त्यांची रोगप्रतिकारशक्ती वाढू शकते. यामुळे आजारांशी लढण्याची त्यांची क्षमता वाढेल आणि ते आजारी पडण्याची शक्यता कमी होईल.

**पुरेशी झोप घेणे**

तुमच्या मुलाला पुरेशी झोप मिळेल याची खात्री करा, कारण थकव्यामुळे रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते. मजबूत रोगप्रतिकारशक्ती शरीराला विविध संसर्ग आणि आजारांचा सामना करण्यास तयार करते.

**शारीरिक हालचालींमध्ये सहभागी व्हा**

डॉक्टरांच्या मते मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी दररोजची शारीरिक हालचाल आणि खेळ आवश्यक आहेत. तुमच्या मुलाला सक्रिय ठेवण्यासाठी आणि त्यांचे शरीर मजबूत करण्यासाठी, त्यांना त्यांच्या वयाला योग्य अशा शारीरिक उपक्रमांमध्ये, जसे की मैदानी खेळ , नृत्य वर्ग, योगा वर्ग, पोहणे इत्यादींमध्ये सहभागी करा.

**स्वच्छतेची काळजी घ्या**

पावसाळ्यात साचलेले पाणी, पूर, चिखल आणि घाण फरश्या स्वच्छ करणे अवघड असते. तुमची मुले घरी परतल्यावर त्यांचे हात-पाय नेहमी धुवा. पावसाळ्यात किमान दोनदा फरशी स्वच्छ करा . फरशी स्वच्छ करताना, जंतुनाशक द्रवामध्ये फरशी स्वच्छ करण्याचे द्रावण मिसळा.

# गरीबी से गौरव तक, पढ़ें चाय बेचते-बेचते

## आयएएस बने हिमांशु की मेहनत और जूनून की कहानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**


कभी बरेली की एक छोटी चाय की दुकान पर काम करने वाला हिमांशु गुप्ता आज यूपीएससी सिविल सर्विस परीक्षा में सफलता हासिल कर आईएएस अधिकारी बन चुका है। हिमांशु की कहानी संघर्ष, मेहनत और आत्मविश्वास की मिसाल है। उन्होंने बिना किसी कोचिंग के यूपीएससी परीक्षा की तैयारी की और २०१९ में ३०४वीं रैंक हासिल की।

हिमांशु का जन्म एक सामान्य परिवार में हुआ। उनके पिता के पास एक छोटी सी चाय की दुकान थी, जहां हिमांशु बचपन में चाय परोसते थे और परिवार की मदद करते थे। उन्होंने अपनी पढ़ाई के दौरान भी पिता की दुकान में काम किया और खाली समय में अखबार पढ़कर सामान्य ज्ञान बढ़ाया।

हिमांशु ने दिल्ली यूनिवर्सिटी के हिंदू कॉलेज से स्नातक की पढ़ाई पूरी की। कॉलेज में एडमिशन मिलने के बाद उन्हें रहने और पढ़ाई के खर्चों के लिए ट्यूशन पढ़ाना पड़ा। इसके अलावा हिमांशु ने पेड ब्लॉग्स लिखकर अपनी आर्थिक स्थिति संभाली। उनका कहना है कि यह उनके लिए पहला मौका था जब वे मेट्रो शहर गए और बड़े शहर में अपनी पढ़ाई के साथ-साथ काम करने का अनुभव मिला।

### ग्रेजुएशन के बाद लिया फैसला

ग्रेजुएशन की पढ़ाई पूरी करने के बाद हिमांशु को एक अच्छी नौकरी का अवसर मिला। लेकिन उनकी इच्छा थी कि वे देश की सेवा करें। उन्होंने यूपीएससी सिविल सर्विसेज की तैयारी का निर्णय लिया। इसके लिए उन्होंने रिसर्च स्कॉलर के रूप में एक सरकारी कॉलेज में दाखिला लिया और एनवायरमेंटल साइंस में मास्टर डिग्री हासिल की। हिमांशु अपने बैच के टॉपर रहे। विदेश से पीएचडी का अवसर मिलने के बावजूद उन्होंने सिविल सर्विसेज का रास्ता चुना। उनका मानना था कि देश की सेवा करना उनके लिए सबसे बड़ी प्राथमिकता है।



### पहले अटेम्प में आईआरटीएस

पहले ही प्रयास में हिमांशु ने यूपीएससी परीक्षा पास की, लेकिन रैंक कम आने के कारण उन्हें आईआरटीएस (इंडियन रेल्वे ट्रॅफिक सर्व्हिस) में चयन मिला। इसके बाद उन्होंने हार नहीं मानी और दोबारा यूपीएससी की परीक्षा में बैठने का फैसला किया। लगातार प्रयास और मेहनत के बाद हिमांशु ने सफलता हासिल की और आईएएस अधिकारी बनकर अपने परिवार और समाज के लिए एक उदाहरण स्थापित किया।

# 'सतत अंग दुखते' का?

## 'हा' घरगुती काढा सात दिवस घ्या व फरक बघा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे सतत अंगदुखी किंवा आळस अंगात असतो. याला पावसाळी वातावरणामुळे शरीरात वातदोष वाढलेला असणे, वात वाढला असल्याने सतत शरीरात अंग दुखी असते, कधी पाठ, कंबर, तळवे, मान, हात असे शरीराचे वेगवेळे भाग नेहमी दुखत असल्याचे आपल्या लक्षात येईल. यासाठी एक सोपा उपाय म्हणजे घरात सहज उपलब्ध असणारे सुंठ, अळशी, जिरे, ओवा यांचा काढा घेणे. रोज सकाळी हा काढा घेतल्यास तुम्हाला आठवडाभरात फरक जाणवेल.

**जिरे :** जिरे शरीरात वाढलेली उष्णता कमी करून गुड सोर्स ऑफ एनर्जी तयार करते. यामुळे तुमची अंगदुखी कमी होण्यास मदत होते.

**ओवा :** ओवा हा शरीरात अग्निदिपन करतो तसेच शरिरात असलेल्या कृमी मारतो.

**सुंठ :** सुंठ ही प्राकृतिकपणे आमवात दूर करते. आमवातामुळे सांधे दुखतात किंवा सांध्यामध्ये सूज येते. पावसाळ्यात हा त्रास खूप होतो. सुंठीच्या औषधी गुणांमुळे अंगदुखी कमी होण्यास मदत होते.

**अळशी किंवा जवस :** अळशी किंवा जवस या अशा बिया आहेत, की ज्यामध्ये हाय इन ओमगा ॲसिड असतात. हे शरीरातील स्टिफनेस पूर्ण कमी असते. परिणामी अंगदुखी कमी होत जाते. हा काढा तयार करताना एक-एक चमचा ओवा व जिरे घ्यायचे आहेत. तर अर्धा चमचा अळशी व चिमूटभर सुंठ पावडर घ्यायची आहे. या सर्वांचा काढा तयार करायचा आहे. तसेच अंगदुखी कमी करण्यासाठी शरीरात एन्डॉर्फिन नावाचे रसायन स्त्रवने खूप महत्त्वाचे आहे. यासाठी योगासनांचा खूप फायदा होतो.

# रात्री झोपताना घरात शिंपडा हा द्रव पदार्थ; साप कधीच पुन्हा जवळ येणार नाही



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेकदा झोपेत सर्पदंश होतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीला झोपेत साप चावतो, तेव्हा त्या व्यक्तीचा मृत्यू होण्याची शक्यता अधिक असते. कारण आपल्याला साप चावला आहे, हे त्या व्यक्तीला लवकर कळतच नाही. जेव्हा कळतं तोपर्यंत उपचारासाठी खूप उशिर झालेला असतो, अशा स्थितीमध्ये या व्यक्तीचा मृत्यू देखील होऊ शकतो.

पावसाळा सुरू झाला आहे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साप बिळाच्या बाहेर निघण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. कारण पावसाळ्यात त्यांच्या बिळात पाणी जाते. त्यामुळे साप बिळातून बाहेर पडतात. अशावेळी ते नेहमी कोरड्या आणि सुरक्षित जागेचा शोध घेत असतात. जर तुमच्या घरात त्यांना अशी जागा मिळाली तर ते तिथे लपून बसतात. तुमचे थोडे जरी दुर्लक्ष झाले तरी देखील तुम्हाला अशा स्थितीत सर्पदंश होऊ शकतो. त्यामुळे कधीही आपल्या घरामध्ये पसारा होणार नाही याची काळजी घ्यावी, घर नेहमी स्वच्छ ठेवावे, तसेच तुमच्या परिसरात किंवा घराजवळ पावसाळ्याच्या दिवसांमध्ये कधीही जास्त गवत वाढू देऊ नये. ज्यामुळे तुम्ही सापांपासून सुरक्षित राहाल.

भारतामध्ये सापांच्या हजारो प्रजाती आढळून येतात, परंतु त्यातील सर्वच साप हे काही विषारी नाहीत. त्यापैकी काही सापांच्या जातीच या विषारी आहेत, यामध्ये मण्यार, फुरसे, घोणस आणि नाग या चार जाती प्रचंड विषारी असतात. या चारही जाती महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात आढळून येतात. यातील सापाची सर्वात धोकादायक जात म्हणजे मण्यार. कारण या सापाचे वैशिष्ट म्हणजे हे साप नेहमी रात्रीच्यावेळीच शिकारीसाठी बाहेर पडतात. अनेकदा तुम्ही झोपेत असताना ते तुमच्या अंथरुणांमध्ये देखील घुसतात. झोपेत तुम्ही बेसावध असतात. अशावेळी त्यांना धक्का लागला की धोका समजून ते तुम्हाला चावा घेतात. मण्यार सापाचे दात हे खूपच बारीक असतात. त्यामुळे आपल्याला काही चावले आहे, हे देखील तुम्हाला कळत नाही. त्यामुळे उपचारासाठी उशीर होतो. हा साप अत्यंत विषारी असल्यामुळे उपचार लवकर न मिळाल्यास तुमचा मृत्यू देखील होतो. महाराष्ट्रात सर्वाधिक मृत्यू हे मण्यार आणि घोणस या दोन सापांच्या चाव्यामुळे होतात.

झोपेमध्ये अशी दुर्घटना घडू नये, म्हणून त्यावर सर्पमित्रांनी एक खास उपाय सांगितला आहे. सापांना कधीही तीव्र वास सहन होत नाही. त्यामुळे काय करायचे कांदा, लसूण, अद्रक हे तीन पदार्थ एकत्र करून त्याचे द्रावण बनवायचे, त्यानंतर हे द्रावण एखाद्या फडक्याच्या मदतीने गाळून तुम्ही जिथे झोपता त्याच्या आसपास आणि घरात शिंपडल्यास साप पुन्हा त्या घरात येत नाही. साप तुमच्या जवळही येणार नाही, कारण या तीव्र वासाचा त्याला त्रास होतो. तसेच घरात झोपताना कधीही खाली जमिनीवर झोपू नका, नेहमी बेडवरच झोपावे, असा सल्ला देखील सर्पमित्रांनी दिला आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम


सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# मंगळ यंत्र घरात स्थापन करावे की नाही?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रात व्यक्तीच्या जन्मकुंडलीला विशेष महत्त्व आहे. जन्मकुंडलीत शुभ-अशुभ असे गुण-दोष असतात. यात मंगळदोष अशुभ मानला जातो. कुंडलीतील मंगळदोष दूर करण्यासाठी मंगळग्रहाची पूजा केली जाते. मंगळ ग्रहाच्या मंदिरात जावून ही पूजा केली जाते. मात्र मंगळ यंत्र घरी आणण्याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम असतो. मंगळ यंत्र घरी आणावे की नाही? मंगळ यंत्राची घरात स्थापना करावी की नाही? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. तुमच्याही मनात हे प्रश्न निर्माण होत असतील, तर ही माहिती तुमच्यासाठी महत्त्वाची. या लेखात आपण घरी मंगळ यंत्र स्थापन करावे की नाही? याविषयी जाणून घेणार आहोत.



ज्योतिषशास्त्रानुसार व्यक्तीच्या जन्मकुंडलीत १, ४, ७, ८ किंवा १२ व्या स्थानात मंगळग्रह असेल तर हा मंगळदोष मानला जातो. मंगळदोषासंदर्भात अनेक समज-गैरसमज असून अनेकांच्या मते मंगळदोष अशुभ मानला जाते. या दोषामुळे व्यक्तीचा विवाह जुळण्यापासून ते जीवनात अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. हा दोष दूर करण्यासाठी श्री मंगळग्रह देवांच्या मंदिरात जात पूजा केली जाते. ही पूजा केल्याने मंगळदोष दूर होतो, अशी मान्यता आहे. श्री मंगळग्रह देवांच्या मंदिरात गेल्यानंतर त्या ठिकाणी श्री मंगळग्रह देवांशी संबंधीत पवित्र वस्तू देखील असतात. यात एक म्हणजे मंगळ यंत्र.

**मंगळ यंत्र घरी आणणे शुभ?**

प्रत्येक जण कोणत्याही धार्मिकस्थळावर गेले, की त्या ठिकाणची काही तरी वस्तू हमखास आणतो. यात प्रमुख्याने देवी-देवतांची मूर्ती किंवा यंत्राला प्राधान्य दिले जाते. श्री मंगळग्रह देवांच्या मंदिरात गेल्यावर तेथे देखील अशा वस्तू उपलब्ध असतात. मात्र, मंगळ यंत्र घरी अणण्याबाबत अनेकांच्या मनात भीती असते. तुमच्याही मनात अशी असेल तर ती आजच काढून टाका. कारण जाणकारांच्या मते घरी श्री मंगळग्रह देवांचे यंत्र स्थापन करणे शुभ असून याचा अनेक प्रकारे लाभ होतो. मान्यतेनुसार मंगळ यंत्र तुमच्या वैवाहिक जीवनातील अडचणी दूर करत प्रत्येत कामात यश देणारे आहे. त्यानुसार श्री मंगळग्रह देवांच्या स्थानावरून मंगळ यंत्र घेऊन मंगळवारी विधीवत पूजन करत मंगळ देवांच्या बीजमंत्राचा २१ वेळा जप करावा. त्यानंतर देवघरात या यंत्राची स्थापना करावी.



## मंगळ यंत्र पूजेने होतो हा लाभ

▲ मान्यतेनुसार मंगळ यंत्राची पूजा करणे खूप शुभ असते. असे केल्याने कुंडलीतील मंगळाचा प्रकोप शांत होतो.

▲ तुम्ही कर्जाच्या समस्येने त्रस्त असाल, तर मंगळ यंत्राची नियमित पूजा करा. असे केल्याने कर्जाची समस्या दूर होते.

▲ यासह ज्या महिलांना गर्भधारणेत अडचण येते अशा महिलांनी मंगळ यंत्राची पूजा करणे लाभदायक ठरते.

▲ मंगळ यंत्रामुळे अपघात तसेच अप्रिय घटनांपासून व्यक्तीचे रक्षण होते. तसेच या यंत्रामुळे रागावरही नियंत्रण मिळविता येते.



## हनुमानजींचे हे अनमोल प्रेरणादायी विचार मंगळवारी जरूर वाचा, जीवनात नेहमी मिळेल यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान श्रीरामचंद्रांच्या प्रत्येक मंदिरात हनुमानजींचे प्रतीक आहे. हनुमानजींच्या उपासनेनेच श्रीरामचंद्रांची पूजा पूर्ण होते. जोपर्यंत तुम्हाला हनुमानजींची ओळख होत नाही तोपर्यंत कोणीही हिंदू धर्म समजू शकत नाही.

हनुमानजी यांना पवनपुत्र असेही म्हणतात. हिंदू धर्माचे लोक त्यांची पूजा करतात. प्रत्येक जण आपापल्या रोगांच्या निवारणासाठी हनुमानजींची पूजा करतो. ते बुद्धी, सामर्थ्य, धैर्य, भक्ती आणि आत्म-शिस्तीचे देव आहेत. हनुमानजींना संकटमोचन असेही म्हणतात. ज्याचा अर्थ आपल्या भक्तांच्या सर्व चिंता दूर करणारे आहेत.

भगवान श्रीरामांच्या प्रत्येक मंदिरात हनुमानजींची मूर्ती असते. हनुमानजींची पूजा केल्यानेच भगवान श्रीरामांची पूजा पूर्ण होते. ते आपली पूजा भगवान श्रीरामांपर्यंत पोहोचवितात, अशी मान्यता आहे. जोपर्यंत तुम्हाला हनुमानजींची ओळख होत नाही तोपर्यंत कोणीही हिंदू धर्म समजू शकत नाही. हनुमानजी जगभरातील लाखो लोकांसाठी प्रेरणास्थान आहेत. अशा परिस्थितीत आज आम्ही तुमच्यासोबत हनुमानजींचे अनमोल विचार शेअर करत आहोत, जे तुम्ही जरूर वाचा. पुराणातही या विचारांचा उल्लेख आहे. पुढे उल्लेख केलेल्या विचारांचा अवलंब केला तर नक्कीच तुमची चिंता, काळजी दूर होण्यास मदत होईल.

**भगवान हनुमानजींचे प्रेरणादायी विचार**

१) धैर्यवान व्हा आणि जे करायला हवे ते करा.
२) परमेश्वराला शरण जा. तुमच्या सर्व चिंता दूर होतील.
३) देवासमोर नतमस्तक कसे व्हायचे हे ज्याला माहिती आहे तो काहीही साध्य करू शकतो.
४) कठीण काळात हार मानू नका, ताकद तुमच्यात आहे.
५) वेळेवर कोणीही विजय मिळवू शकत नाही. परंतु वेळ सर्वांवर विजय मिळविते.
६) विश्वासापेक्षा मोठी शक्ती नाही.
७) कठोर परिश्रम आणि समर्पण हाच जिंकण्याचा एकमेव मार्ग आहे.
८) तुमच्या उद्देशाप्रती निष्ठा तुम्हाला यशाकडे नेईल.
९) विश्वास हा तुम्ही आणि देव यांच्यातील पूल आहे.
१०) क्षमा केल्याने खऱ्या स्वातंत्र्याचे दरवाजे उघडतात.

## आज मंगळवार : श्रीराम भक्त हनुमानजींनी का घेतला पंचमुखी अवतार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात प्रभू श्रीरामचंद्रांचे परम भक्त हनुमानजींना विशेष महत्त्व आहे. कलियुगात हनुमानजी चिरंजीवी आहेत. हनुमानजींच्या साध्या नामस्मरणाने व्यक्तीचे सर्व दुखः दूर होतात. धार्मिक मान्यतेनुसार हनुमानजी महादेवांचा ११ वा अवतार आहेत. प्रभू श्रीराम भक्त हनुमानजी महादेवांचा रुद्र अवतार मानला जातो. हा अवतार अत्यंत बलवान आणि बुद्धिमान आहे. हनुमानजींना बजरंगबली, मारुती, संकटमोचन, पवनपुत्र अशा विविध नावांनी ओळखले जाते. प्रभू श्रीराम भक्त हनुमानजी शक्तीचे प्रतीक आहेत. अशा या हनुमानजींनी पंचमुखी अवतार घेतला होता. हनुमानजींनी पंचमुखी अवतार का घेतला? हनुमानजींच्या पाच मुखांचे महत्त्व काय? या पाच मुखांची नावे, दिशा आणि महत्त्व काय? याविषयी जाणून घेऊया.

**हनुमानजींनी पंचमुखी अवतार का घेतला?**

पौराणिक कथेनुसार प्रभू श्रीराम आणि रावण यांच्यातील युद्धात रावणाचे सैन्य पराभूत झाले. रावणाला जेव्हा समजले, की त्याचे सैन्य युद्धात पराभूत होत आहे. तेव्हा रावणाने त्याचा मायावी भाऊ अहिरावणाकडे मदत मागितली. अहिरावण देवी भवानींचा परम भक्त होता आणि त्याला विविध विद्या देखील अवगत होत्या. त्याने त्याच्या मायावी विद्येच्या मदतीने प्रभू श्रीरामचंद्रांच्या संपूर्ण सैन्याला निद्रिस्त केले. दरम्यान, त्याने प्रभू श्रीराम आणि लक्ष्मण यांचे अपहरण करत त्यांना पाताळ लोकात नेले.

देवी भवानींचा भक्त असलेल्या अहिरावणाला वरदान प्राप्त होते, की जो कोणी अहिरावणाने लावलेले ५ दिवे एकाच वेळी विझवू शकेल तोच अहिरावणाचा वध करू शकतो. या वरदानानुसार अहिरावणाने पाच दिशांना पाच दिवे लावले होते. प्रभू श्रीराम आणि लक्ष्मण यांना अहिरावणाच्या तावडीतून सोडविण्यासाठी हनुमानजींनी पंचमुखी अवतार धारण करून पाचही दिवे एकाच वेळी विझवून अहिरावणाचा वध केला. त्यानंतर प्रभू श्रीराम आणि लक्ष्मण अहिरावणाच्या बंधनातून मुक्त झाले.

**हे आहे पंचमुखी अवताराचे**

**वानर मुख**

पंचमुखी अवतारातील हनुमानजींचे पूर्व दिशेला जे मुख आहे त्याला वानर मुख म्हणतात. मान्यतेनुसार वानर मुख शत्रूंवर विजय मिळवून देतो.

**गरुड मुख**

हनुमानजींच्या पश्चिम दिशेला जे मुख आहे त्याला गरुड मुख म्हणतात. मान्यतेनुसार हे मुख जीवनातील अडथळे आणि त्रास दूर करण्याचे काम करते.

**वराह मुख**

हनुमानजींच्या पंचमुखी अवतारात उत्तराभिमुख असलेल्याला मुखाला वराह मुख म्हणतात. असे मानले जाते, की हनुमानजींच्या या मुखाची पूजा केल्याने दीर्घायुष्य, कीर्ती आणि वैभव प्राप्त होते.

**नृसिंह मुख**

दक्षिण दिशेला असलेल्या हनुमानजींच्या या मुखाला नृसिंह मुख म्हणतात. धार्मिक मान्यतांनुसार नृसिंह मुखामुळे जीवनातील तणाव आणि अडचणी दूर होतात.

**अश्व मुख**

हनुमानजींचे पाचवे मुख आकाशाकडे आहे. याला अश्व मुख देखील म्हणतात. हे मुख मनोकामना पूर्ण करणारे मानले जाते.

**अशी करा पूजा**

हिंदू धर्मात मंगळवार आणि शनिवार हनुमानजींना समर्पित आहेत. अशा स्थितीत या दिवशी पूजेदरम्यान हनुमानजींना लाल फुले, सिंदूर आणि चमेलीचे तेल अर्पण करावे. तसेच बजरंगबलीला गूळ आणि हरभरा अर्पण करावा. या दिवशी सुंदरकांड किंवा हनुमान चालिसाचे पठण करावे.

नकारात्मक ऊर्जा दूर राहते लक्षात ठेवा, की पंचमुखी हनुमानजीं मूर्ती किंवा फोटो नेहमी घराच्या दक्षिण दिशेला लावावा. दक्षिण दिशेशिवाय घराच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात पंचमुखी हनुमानजींचे चित्रही लावू शकता. यामुळे वास्तुदोष दूर होतात. त्याचबरोबर घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर पंचमुखी हनुमानजींची मूर्ती ठेवल्याने नकारात्मक ऊर्जा घरापासून दूर राहते.

## गणपती बाप्पांना जानवे कसे घालावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजपर्यंत आपण गणपती बाप्पांच्या अनेक मूर्ती किंवा चित्रे पाहिली असतील तर असे आढळून आले आहे, की श्रीगणेश अर्थात गणपती बाप्पांच्या गळ्यात जानवे असते. ते काय असते? याबद्दलची माहिती आपण जाणून घेऊ.



**जानवे म्हणजे काय?**

हिंदू धर्मात जानवे किंवा यज्ञोपवीत तथा ब्रह्मसूत्र हे पुरुषाने शरीरावर परिधान करावयाचे एक सूत्र आहे. यज्ञाने पवित्र झालेले ते यज्ञोपवीत अशी व्याख्या केली जाते. जानवे कापसाच्या तंतूंनी तयार केले जातात. याची तीन सूत्रे एकत्र करून त्याचा एक पदर तयार करतात. तीन पदर एकत्र करून एक विशिष्ट गाठ ज्याला ब्रह्मगाठ म्हणतात. ती बांधली जाते. अशा रीतीने जानवे तयार होतात.

जानव्यात तीन सूत्र- त्रिमूर्ती ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे प्रतीक- देवरुण, पितृरुण आणि ऋषिरुण - सत्त्व, रज आणि तम यांचे प्रतीक आहे. यासोबतच ही तीन सूत्रे गायत्री मंत्राच्या तीन चरणांचे प्रतीक आहेत आणि तीन आश्रमांचेही प्रतीक आहेत.

जानव्यात प्रत्येक सूत्रात तीन तार असतात. त्यामुळे एकूण संख्या नऊ अशी असते. त्याची लांबी ९६ अंगुळे असावी, असे सांगितले आहे. जानव्यातील एकूण ९ तंतू- पहिल्या तंतूवर ओमकार, दुसऱ्यावर अग्नी, तिसऱ्यावर नवनाग, चौथ्यावर सोम, पाचव्यावर पितर, सहाव्यावर प्रजापती, सातव्यावर वायू, आठव्यावर यम, नवव्यावर विश्वदेव असतो.

यामध्ये एक तोंड, दोन नाकपुड्या, दोन डोळे, दोन कान, विष्ठा आणि लघवीच्या दोन मार्गांसह एकूण नऊ आहेत. याचा अर्थ - आपण तोंडाने चांगले बोलावे आणि चांगले खावे, डोळ्यांनी चांगले पाहिले पाहिजे आणि कानांनी चांगले ऐकले पाहिजे. ब्रह्म, धर्म, अर्ध, काम आणि मोक्ष यांचे प्रतीक असलेल्या जानव्यात पाच गाठी ठेवल्या जातात. हे पाच यज्ञ, पाच इंद्रिये आणि पाच क्रिया यांचेही प्रतीक आहे.

**गणपतीला जानवे कसे घालावे?**

**राजतम् ब्रह्मासूत्रम्च कांचनम् चोत्तरीयकम्।**
**गृहाण चारु सर्वज्ञ भक्तानाम् वरदो भव।।**
**श्रीसिद्धिविनायकाय नमः।**
**यज्ञोपवितम् समर्पयामि।।**

श्रीगणेशांना जानवे डाव्या खांद्यावरून उजव्या हाताखाली अर्पण करावे. तसेच गणपती बाप्पांना कधीही पांढरे वस्त्र अर्पित करू नये. गणपती बाप्पांना पांढरे जानवे देखील अर्पित करू नये, असे सांगितले जाते. जानवे हळदीत पिवळे करून गणपती बाप्पांना अर्पित केले पाहिजे. आर्थिक समस्यांपासून मुक्ती मिळविण्यासाठी बुधवारी गणपती बाप्पांना जानवे अर्पित करावे. सोबत पाच अख्ख्या सुपाऱ्या ठेवाव्यात. मग गणपती बाप्पांचे ध्यान करावे. असे केल्याने धनवृद्धी होते, असे मानले जाते.

**मनुष्याने जानवे वापरण्याचे नियम**

जानवे डाव्या खांद्यावर आणि उजव्या हाताखाली लोंबणारे असे धारण करावे. ते नेहमी आणि देवकार्याच्या वेळी डाव्या खांद्यावर म्हणजे अपसव्य असावे. अन्य वेळी म्हणजे मानुषकर्माच्या वेळी निवीती म्हणजे माळेसारखे ठेवावे. जानव्यावाचून भोजन केल्यास प्रायश्चित्त सांगितलेले आहे. शौच व लघुशंका हे विधी करण्याच्या वेळी ते उजव्या कानावर ठेवावे. एकाने दुसऱ्याचे जानवे वापरू नये. जानवे तुटले तर ते उदकात टाकून द्यावे तसेच नवे धारण करावे.

जानवे धारण करताना खालील मंत्र म्हणतात-

**ॐ यज्ञोपवीतं परम पवित्रं प्रजापतये सहज पुरस्तात् । आयुष्यमग्रं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः।।**

तसेच जानवे बदलताना हा मंत्र-

**एतावद् दिन पर्यंन्तं ब्रह्मं त्वं धारितं मया।**
**जीर्णत्वात्त्वपरित्यागो गच्छ सुत्र यथा सुखम्।।**

# श्री गणेशांचा महिमा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री गणेश ही विद्येची देवता व संकटांचे निवारण करणारी देवता म्हणून प्रसिद्ध आहे. एखाद्या महत्कार्याच्या आरंभी ' श्री गणेशाय नमः ' म्हणून श्री गणेशाची स्तुती व आराधना करण्याचा प्रघात आहे. त्याचप्रमाणे अध्ययनाच्या आरंभीही श्री गणेशांचा नामोच्चार करतात. श्री गणेश सकळ विघ्नांचा हर्ता व मंगलमूर्ती असा मानला जात असल्यामुळे या देवांचे पूजन सर्वांच्या घरी होते.

हिंदूंमध्ये जे अनेक उपासना पंथ निर्माण झाले त्यामध्ये 'गाणपत्य' हा एक पंथ आहे. गाणपत्याचे दैवत आहे गणपती. पार्वतीच्या अंगाच्या मळापासून गणपती निर्माण झाले, अशी एक दंतकथा आहे. त्याप्रमाणे व्यासांनी सांगितलेले महाभारत गणपतींनी लिहिले, अशी समजूत आहे. अंगाने स्थूल , किंचित पिवळट वर्णाचे, मोठ्या पोटाचे, चार हात असलेले व एकदंत, हत्तीचे डोके असलेले, असे गणपतींचे रूप पुराणात वर्णिले आहे. त्यांनी आपल्या चारही हातांत शंख, चक्र, गदा व पद्म ही आयुधे धारण केली आहेत. कधी-कधी उंदराला आपले वाहन करून त्यावर बसून चालले आहेत, असेही गणपती बाप्पांचे वर्णन आढळते. गणपतींना हत्तीचे मस्तक का लागले, याबद्दल अनेक दंतकथा प्रचलित आहेत.

शनीच्या कटाक्षापासून होणाऱ्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करून माता पार्वतींनी एकदा शनीला गणपतींकडे बघण्यास सांगितले. कारण त्यांना आपल्या पुत्राचा फार अभिमान होता. शनीने गणपतींकडे दृष्टी फिरवताच गणपतींचे मस्तक जळून खाक झाले तेव्हा माता पार्वतींना अतिशय दुःख होऊन त्यांनी ब्रह्मादेवांना ही हकीकत कथन केली. ब्रह्मादेवांनी त्यांना सांगितले, की तुला पहिल्या प्रथम ज्या प्राण्याचे मस्तक मिळेल ते मस्तक धडाला लाव म्हणजे गणपती पूर्ववत होईल. ब्रह्मादेवाच्या सांगण्याप्रमाणे ती मस्तकाच्या शोधात निघते. प्रथम तिला हत्तीचे मस्तक मिळते. याप्रमाणे गणपती 'गजवदन' झाल्याची एक दंतकथा आहे.

दुसरी एक दंतकथा अशी आहे, की माता पार्वती स्नानासाठी बसल्या असता त्यांनी गणपती बाप्पांना दरवाजावर राखण करण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे गणपती बाप्पा दरवाजाजवळ बसून राहतात. तेवढ्यात भगवान शंकर तेथे येतात. परंतु त्यांना आत जाण्यास गणपती बाप्पांनी प्रतिबंध केल्यामुळे ते गणपतींचे शिर उडवितात. त्यामुळे माती पार्वतींना खूप दुःख होते. त्यांचे सांत्वन करण्यासाठी भगवान शंकर त्यांच्या धडावर हस्तीचे मस्तक बसवून गणपतींना सजीव करतात.

एकदा परशुराम भगवान शंकर यांची भेट घेण्यासाठी कैलास पर्वतावर जातात. त्यावेळी शंकर निद्रिस्त असतात. तेव्हा परशुरामाला अंतर्गृहात येण्यास गणपती मज्जाव करतात. त्या दोघांमध्ये बाचाबाची होऊन युद्ध जुंपते. गणपती परशुरामाला आपल्या सोंडेत धरून गरगर फिरवताच त्याला मूर्च्छा येते. सावध झाल्यानंतर परशुराम आपला परशू गणपतींवर फेकतात. (भगवान शंकरांनीच तो परशू परशुरामाला दिलेला असतो. त्यामुळे गणपतींनी आदराने तो आपल्या एका दातावर धारण केला. पण त्यामुळे त्यांना तो दात गमवावा लागतो. म्हणूनच गणपतींना 'एकदंत' किंवा 'एकदंष्ट' असे म्हणतात.



इतर देवतांप्रमाणे गणपतींची उपासना करणारा एक संप्रदाय भारतात आहे. या संप्रदायाला 'गाणपत्य' असे म्हणतात. हाच परमात्मा असून त्यानेच सर्व ब्रह्मांड निर्माण केले, असे या पंथाचे अनुयायी मानतात. या पंथाच्या आचार्यांनी निरनिराळे ग्रंथ लिहिले. हे सर्व ग्रंथ त्या पंथाच्या अनुयायांनी प्रमाण मानले आहेत. या संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ वस्दतापलीय अगर गणपती तापनीय उपनिषद, गणेश पुराण, मुगदल पुराण व ब्रह्मावैवर्त पुराणाला गणेश खंड असे आहेत. 'गणेश संहिते'त अगर 'गणपत्यनिषदा'त गणपती व ग्रहण हे एक असून गणपती हा जगताचा आदीकारण होय, असे सांगितले आहे. गणेश खंडामध्येदेखील अशाच कथा आहेत.

ब्रह्मावैवर्त पुराणामध्ये एका अध्यायात राधा श्रीगणेशांची पूजा करत असे, असे सांगितले आहे. हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. गणेश खंडामध्येदेखील अशाच कथा आहेत. गणेश खंडात भगवान शिव यांनी गणपतींना प्रसन्न करून घेण्यासाठी दहा वर्षे घोर तपश्चर्या केली व त्यापासून त्रिपुरासुराचा वधाचा वर प्राप्त करवून घेतला, असे वर्णन आलेले आहे.

गणेश गीता नावाचाही एक ग्रंथ आहे. पण तो जवळजवळ भगवद्गीतेसारखाच आहे. फक्त 'कृष्णाऐवजी श्री गणेश 'नाव घालण्यात आले आहे याखेरीज 'गणपती कवच', 'गणपती पंचरत्न', गणपती पंचांग', गणपती पंचावरण स्तोत्र' (शंकराचार्यकृत), 'गणपतीपुराश्चरणाविधी', 'गणपती पूजा', 'गणपती पंत्र विधान', 'गणपती मानसपूजा', 'गणपती रत्नप्रदीप', 'गणपती रहस्य', 'गणपती सूक्त', 'गणपती स्तवराज', 'गणेश महात्म्य' इत्यादी अनेक गणेश पूजनांचे ग्रंथ आहेत.

आनंदतीर्थांनी लिहिलेल्या 'शंकर दिग्विजया'मध्ये भया गणपत्यासंबंधीचा व त्यांच्या तत्त्वांचा उल्लेख आला आहे. हा ग्रंथ दहाव्या शतकांमध्ये लिहिला गेला असावा. या ग्रंथामध्ये गाणपत्यांचे सहा पोटभेद होते. हे पोटभेद म्हणजे 'महागणपती पंथ', हरिदागणपती पंथ', 'उच्छिद गणपति पंथ', 'नवनीत गणपती पंथ', 'स्वर्गगणपती पंथ' व 'सनातन गणपती पंथ' हे आहेत.

या पंथांपैकी उच्छिष्टा गणपती पंथ' थोडासा चमत्कारिक आहे. या पंथाचे अनुयायी गणपतींची डाव्या हाताने पूजा करतात. हे लोक गणपतींना 'ऐरंब' हे नाव देतात. या पंथात जातिभेद पाळण्यात येत नाही. सर्व विवाहविषयक निबंधींना या पंथात थारा नाही. चंदकृती तांबडे गंध लावणे ही गाणपत्यांची मुख्य खूण होय.

भादपद शुद्ध चतुर्थीस (गणेश जन्मदिवसापासून) या सणाला आरंभ होतो. गणेशदेवता व शेतीचा हंगाम यांचा अन्योन्य संबंध असावा. कारण पावसाला उशीर झाल्यामुळे आगामी पीकपाण्याबद्दल अनिश्चितता वाटू लागल्यावर 'विघ्नहर्ता' श्री गणेशांचे पूजन करणे हे प्रसंगोचित व जरूरी आहे.

'व्रतराज' ग्रंथात या व्रताचा उल्लेख येते. भाद्रपद शुद्ध चतुर्थीस श्री गणेशांची सुवर्णाची मूर्ती करून तिची प्राणप्रतिष्ठेपासून पूजा करून हवनादी विधी करावेत व नंतर ती मूर्ती ब्राह्मणास दान करावी इत्यादी विधी सांगितला आहे.

संकष्टी चतुर्थी या व्रताचा संबंध चंद्राकडे नसून, श्री गणेशांकडेच आहे. परंतु श्री गणेश व चंद्र यांचाही अन्योन्य संबंध आहे, ही गोष्ट गणेश चतुर्थीस दिसून येते. कारण त्या दिवशी चंद्र पाहणे अशुभ मानतात. कोणी चुकून चंद्र पाहिलाच तर त्याला शेजारच्या घरावर दगड फेकून व चार शिव्या खाऊन ते अशुभ टाळता येते. चतुर्थीचा चंद्र पाहणे व विपद्रस्त होणे या गोष्टी मराठीत समानार्थी मानल्या जातात.

पेशव्यांच्या राजवाड्यात प्रतिवर्षी भादपद शुद्ध चतुर्थी ते दशमीपर्यंत गणेशोत्सव होत असे. त्याप्रसंगी गणपती रंग महालात मोठी आरास केली जाई. सर्व कार्यक्रम तेथेच होत. स्वच्छ हंडे, झुंबरे, मोठे आरसे व विविध चित्रे यामुळे त्या महालाचे सौंदर्य द्विगुणीत होत असे. मध्यावर सोन्याच्या भरजरीचे काम जिच्यावर केले आहे अशी पेशव्यांची 'मनसद' ऊर्फ गादी मांडलेली असे. दोन्ही बाजूंना मुख्य मराठे सरदार, शिलेदार व दरबारी हे भरजरी पोशाख घालून आपापल्या दर्जाप्रमाणे रांगेने बसलेले असत. भालदार, चोपदार यांच्या ललकारीत स्वारी दरबारात प्रवेश करून मोठ्या ऐटीने सिंहासनारूढ होत असे. गणपती रंग महालात त्यावेळी गाणे, नाच, कथा-कीर्तने वगैरे कार्यक्रम होत.

या उत्सवात सर्व नोकर-चाकर मोठ्या हौसेने मिसळत. त्यांना पेशव्यांकडून मिठाई वाटण्यात येई. ब्राह्मण भोजन बरीच होत. विसर्जनाच्या दिवशी पुष्पांनी शृंगारलेल्या पालखीतून थाटाची मिरवणूक काढून गणपती विसर्जन होई. त्यावेळी पेशवे जातीने हजर असत.

गणपती उपासनेचे महात्म्य महाराष्ट्रात व दक्षिण भारतात आढळून येते. द्रविड लोकांचा हा मूळचा देव असावा. या देवांचे वाहन उंदीर आहे. द्रविड लोकांची 'औरौन' म्हणून जी एक जात आहे त्या जातीचे उंदीर हे प्रमुख दैवत आहे. श्रावणकोरमध्ये होमपुरे' ऊर्फ गणपतींची देवळे पुष्कळ ठिकाणी असून त्या ठिकाणी दररोज होम केला जातो. काही ठिकाणी क्वचितप्रसंगी 'महागणपति होम' नावाचा खर्चिक होमही करण्यात येतो.

पुण्याजवळ चिंचवडला गणपतींची स्वयंभू मूर्ती असून त्या ठिकाणी मार्गशीर्ष वद्य प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत मोठा उत्सव करण्यात येतो. येथील मोरया गोसावी नावाच्या साधूने गणपतींना प्रसन्न करून घेतले. 'मी तुझ्या शरीरात व तुझ्यामागून होणाऱ्या सहा पुरुषांत अंश रूपाने वास करेन ,' असा गणपतींनी त्याला वर दिला. त्याप्रमाणे मोरया व त्याचे सहा वंशज यांच्यामध्ये गणपती वास करतो , अशी समजूत असून या सात जणांच्या समाधीची गणपती या नात्याने दररोज पूजा करण्यात येते. या गणपती संस्थानला अनेक भाविकांनी देणग्या दिल्या असून , खुद्द औरंगजेब बादशहानेदेखील त्या संस्थानला आठ खेडी इनाम दिल्याचा उल्लेख आढळतो.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)